सोमवार दि. २५ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जनसेवक हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# बदनापूर हद्दीत साडेबारा लाखांचा प्रतिबंधित गुटखा व वाहन जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेचा मध्यरात्री सापळा यशस्वी; दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल; जालना पोलिसांची धडक कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाल्याच्या अवैध व्यापाराविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल १२ लाख ६६ हजार ४३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने मध्यरात्री सापळा रचून ही कारवाई केली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, तंबाखूजन्य पदार्थ तसेच वाहतुकीसाठी वापरले जाणारे अशोक लेलँड वाहन यांचा समावेश आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले आहे.



जिल्ह्यात वाढत असलेल्या प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध वाहतूक व विक्रीला आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु आणि अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस यंत्रणांना अशा अवैध व्यवसायांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्याच अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

**गुप्त माहितीवरून आखला सापळा**

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना त्यांच्या विश्वासू सूत्रांकडून माहिती मिळाली होती की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेकटा परिसरातील एक व्यक्ती मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला भरून वाहनाद्वारे जालना जिल्ह्याकडे येत आहे. हा माल बाजार गेवराई मार्गे बदनापूरकडे आणला जाणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जाधव यांनी तातडीने विशेष पथक तयार करून संबंधित मार्गांवर पाळत ठेवण्याच्या सूचना दिल्या. माहितीच्या आधारे पोलिसांनी बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध ठिकाणी गुप्तपणे नाकाबंदी केली. संशयित वाहनाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. अखेर दिनांक २४ मे २०२६ रोजी पहाटे सुमारे १.३६ वाजण्याच्या सुमारास संशयित वाहन पोलिसांच्या नजरेस पडले.

**वाहनाची झडती घेताच उघड झाला गुटख्याचा साठा**

पोलिसांनी संशयित अशोक लेलँड वाहन (क्रमांक -२०--२१९४) अडवून त्याची सखोल तपासणी केली. वाहनामध्ये पांढऱ्या आणि खाकी रंगाच्या गोण्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर विविध कंपन्यांचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थ साठवून ठेवण्यात आले होते. महाराष्ट्रात विक्री आणि साठवणुकीवर बंदी असलेल्या या पदार्थांची वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी संपूर्ण माल जप्त केला.

झडतीदरम्यान वाहनचालकाकडे संबंधित मालाची कोणतीही वैध कागदपत्रे किंवा परवानगी आढळून आली नाही. त्यामुळे पोलिसांनी वाहनासह संपूर्ण माल ताब्यात घेतला आणि आरोपीला अटक केली.

**साडेबारा लाखांचा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मालामध्ये विविध ब्रँडचे गुटखा व पानमसाला आढळून आले. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे राजनिवास पान मसाला ₹१,६८,७५०, गोवा-१००० गुटखा ₹१,५३,०००, व्ही-१ विंग तंबाखू ₹६,०००, विमल पान मसाला ₹१,३०,६८०, के.एन. ०१ जाफरानी जर्दा ₹१,०८,०००, वाहतुकीसाठी वापरलेले अशोक लेलँड वाहन ₹७,००,०००, एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ₹१२,६६,४३० इतकी आहे. दोन आरोपींविरुद्ध गुन्हा या प्रकरणात पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

त्यामध्येः जावेद गुलाब मिर्झा बेग (वय ३४ वर्षे, रा. शेकटा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) यास घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आले. संदीप भुमकर (रा. राजूर, जि. जालना) प्राथमिक तपासात त्याचा देखील या अवैध वाहतूक प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध बदनापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता () कलम १२३, २२३, २७५ आणि ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. गुटखा पुरवठा साखळीचा तपास सुरू पोलिसांनी केवळ वाहन व माल जप्त करण्यापुरती कारवाई मर्यादित न ठेवता या अवैध व्यापारामागील संपूर्ण साखळीचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे. जप्त करण्यात आलेला गुटखा नेमका कुठून आणण्यात आला, तो कोणाकडे पोहोचविला जाणार होता, तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. तपास यंत्रणांना या अवैध व्यवसायाशी संबंधित आणखी काही धागेदोरे मिळाल्याची माहिती असून, येत्या काही दिवसांत आणखी कारवाया होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधु, अप्पर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, तसेच पोलीस अंमलदार सागर बाविस्कर, देविदास भोजने, दत्ता वाघुंडे, आक्रूर धांडगे, धीरज भोसले, सोपान क्षीरसागर, सचिन राऊत आणि अशोक जाधवर यांनी सक्रिय सहभाग घेतला.

**गुटखा माफियांमध्ये खळबळ**

जिल्ह्यातील प्रतिबंधित गुटखा व्यापाराविरोधात करण्यात आलेल्या या मोठ्या कारवाईमुळे गुटखा तस्कर आणि अवैध विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणाऱ्या तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध व्यापारावर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस प्रशासनाने अशा कारवाया यापुढेही अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. जिल्ह्यातील अवैध गुटखा साठवणूक, वाहतूक आणि विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# भोकरदनमध्ये देहव्यापार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## पती-पत्नीसह खोली मालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**भोकरदन - प्रतिनिधी**

भोकरदन शहरातील म्हाडा कॉलनी परिसरात सुरू असलेल्या कथित देहव्यापाराच्या अड्ड्यावर भोकरदन पोलिसांनी धडक कारवाई करत पती-पत्नीसह खोली मालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली असून रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण ३५ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरात खळबळ उडाली आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २३ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास भोकरदन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांना म्हाडा कॉलनी येथील गजानन मंदिराजवळ असलेल्या एका टिनपत्राच्या शेडमध्ये बाहेरील जिल्ह्यांतील महिलांना आणून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेतला जात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती.

या माहितीची वरिष्ठ अधिकाऱ्यांना कल्पना देण्यात आली. पोलीस अधीक्षक तेंघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नियुक्ती करण्यात (पान २ वर)

# शिंदे व चाकणकरांचे बाबा म्हणूनच अशोक खरात याच्यावर कारवाई

## प्रा. श्याम मानव यांचे जालन्यातील व्याख्यानात प्रतिपादन

**जालना - प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याशी संबंधित बाबा म्हणून अशोक खरातवर तातडीने कारवाई करण्यात आली ,मात्र खरात प्रकरणात भाजपचे ज्येष्ठ आमदार आणि मंत्र्यांचा सहभाग असता तर खरातवर कारवाई झाली असती का?असा सवाल अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय संस्थापक प्रा. श्याम मानव यांनी येथे उपस्थित केला.




जालना शहरातील मातोश्री लॉन्सवर शनिवारी ( दि. २३) बुवा तेथे बायाया विषयावर आयोजित व्याख्यान प्रसंगी ते बोलत होते.अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती जालना व समविचारी सामाजिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख हे अध्यक्षस्थानी होते. उद्योजक तथा सामाजिक नेते नारायण चाळगे हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विचारमंचावर अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमूरे, राष्ट्रीय सचिव प्रशांत सपाटे,दत्ताभाऊ शिरसाट, संतोष गाजरे, विभावरी ताकट,तुळशीराम शेळके, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जालना जिल्हाध्यक्ष मोहन राठोड, कार्याध्यक्ष काकासाहेब खरात, जिल्हा संघटक सुनील वाघ आदींची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना प्रा. मानव पुढे म्हणाले की, शुद्धिकरण प्रक्रियेच्या नावाखाली अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले आहे. त्याने चिंचोके पॉलिश करून ते रत्न म्हणून विकले. इशान्येश्वर मंदिरात पूजेसाठी अनेकांकडून प्रत्येकी तीन कोटी रुपये घेतले. मी गुन्हा केला नाही तर धार्मिक विधीनुसार संबंध ठेवले, असे खरात म्हणतो. या सगळ्या प्रकरणांमध्ये महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रूपाली चाकणकर आणि ईशान्येश्वर मंदिराच्या विश्वस्तांनी मदत केली आहे. त्यामुळे या सर्वांवर तातडीने गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी प्रा. मानव यांनी यावेळी केली. धीरेंद्र कृष्ण महाराज ऊर्फ बागेश्वर बाबा हासुद्धा (पान २ वर)

# प्रभाग ९ मधील नागरी समस्या तातडीने सोडवा; अन्यथा आंदोलन - शुभम टेकाळे

## युवासेनेचा मनपा आयुक्तांना निवेदनाद्वारे इशारा

**जालना -प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील अत्यंत गंभीर आणि प्रलंबित नागरी समस्या तातडीने मार्गी लावण्यात याव्यात, या मागणीसाठी युवासेना लोकसभाचे सचिव इंजि. शुभम हरिभाऊ टेकाळे यांनी महानगरपालिकेच्या आयुक्त अंजली शर्मा यांना लेखी निवेदन सादर केले आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पाणी आणि स्वच्छतेच्या भीषण समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने प्रशासनाने यावर त्वरित पावले उचलावीत, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




श्री. टेकाळे सादर सदर निवेदनात म्हटले आहे की, प्रभागातील विविध भागांमध्ये घंटागाडी नियमित येत नसल्याने कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तरी घंटागाडी तात्काळ व नियमित सुरू करण्यात यावी, उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता १०-१२ दिवसांऐवजी कमीत कमी दर ३ दिवसांनी प्रभागात पाणीपुरवठा करण्यात यावा, अनेक ठिकाणी नाल्या तुंबलेल्या असून, ड्रेनेजचे चेंबर उघडे पडले आहेत. अपघात टाळण्यासाठी त्यावर तातडीने ढापे टाकण्यात यावेत, रेल्वे स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे ढीग साचले असून, कचरा टाकणाऱ्यांवर योग्य ती दंडात्मक व प्रतिबंधात्मक कारवाई करावी, प्रभागधील सरस्वती भुवन प्रशालेच्या मागून ते थेट कुंडलिका नदीपर्यंत जाणाऱ्या मोठ्या नाल्याची पावसाळा सुरू होण्यापूर्वी संपूर्ण साफसफाई करण्यात यावी, महानगरपालिकेसमोरील मुख्य रस्त्यावरील पुलाचे (मसोबा मंदिर जवळ) काम मागील १ वर्षापासून संथ गतीने सुरू असल्याने हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद आहे. हे काम तातडीने पूर्ण करून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा. प्रभाग क्र. ९ अंतर्गत येणाऱ्या सोनलनगर, निलमनगर, नरिमननगर, इनकमटॅक्स कॉलनी, घायाळनगर, म्हाडा कॉलनी, मधुबन कॉलनी, डबलजिन, लक्ष्मीनारायणपुरा, मस्तगड, सुभद्रानगर (पान २ वर)

# शासकीय कर्तव्यावर असताना काळाचा घाला, लातूरमध्ये कारच्या धडकेत बीडच्या महिला पर्यवेक्षिकेचा दुर्दैवी मृत्यू

शिरूर अनंतपाळ (प्रतिनिधी) : शुक्रवारी दि.२२ मे रोजी सकाळी लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ तालुक्यात एक अत्यंत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. आपल्या शासकीय जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी निघालेल्या दोन कर्तव्यदक्ष महिला पर्यवेक्षिकांना भरधाव कारने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात मूळच्या बीड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या एका ३२ वर्षीय महिला पर्यवेक्षिकेचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, कर्तव्यावर असतानाच एका लेकीचा जीव गेल्याने तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिला पर्यवेक्षिकेचे नाव तनुजा घोडके- शिंदे (वय ३२ वर्षे) असे असून, त्या मूळच्या बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील तलवाडा गावच्या रहिवासी होत्या. शिरूर अनंतपाळ येथील एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयात त्या पर्यवेक्षिका म्हणून कार्यरत होत्या. शुक्रवारी सकाळी तनुजा घोडके- शिंदे आणि त्यांच्या सहकारी पर्यवेक्षिका अनुसया खलंग्रे (रा. कवठाळा, ता. चाकूर) या दोघी दुचाकीवरून अंगणवाडी केंद्रांना भेटी देण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. तालुक्यातील चामरगा येथील अंगणवाडीची पाहणी केल्यानंतर, या दोघी उदगीर-लातूर महामार्गाने डिगोळ येथील पुढील अंगणवाडीकडे निघाल्या होत्या. चामरगा पाटीजवळ असताना, त्या रस्त्याच्या कडेला थांबलेल्या एसटी बसच्या बाजूने मार्गक्रमण करत होत्या. याचवेळी उदगीरकडून लातूरच्या (पान २ वर)

## संपादकीय...

# धर्मांधितेचा वारू तमिळनाडूने रोखला

राजकारणात वेगळ्या विचाराचे लोक हे विरोधक असतात शत्रू नव्हे, पण राजकारणाने युद्धाचे भयावह स्वरूप घेतल्याने आता विरोधक हा शत्रू झालेला आहे. आपला शत्रू म्हणजे देशद्रोहीच अशी बायनरी स्थापित झालेली आहे.

धार्मिक, भाषिक, जातीय, भौगोलिक, वांशिक विविधता असलेला आणि वेगवेगळ्या ५६२ संस्थानांमध्ये विभागलेला भारतीय उपखंडाचा एक विशाल भाग ब्रिटिशांच्या राजवटीतून मुक्त होऊन भारत नावाचा स्वतंत्र देश अस्तित्वात आला तेव्हा एवढी विविधता असलेला देश एकत्रित कसा ठेवायचा हे आव्हान देशाच्या तत्कालीन नेतृत्वासमोर होते. ते आव्हान त्यांनी एक उत्कृष्ट संविधान देशाला देऊन यशस्वीपणे पेलले. आपल्यासोबत स्वातंत्र्य मिळालेल्या देशांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असताना भारतासारखा विशाल, विविधतेने नटलेला देश मात्र ऐक्य आणि अखंडता टिकवून आपला विकास करीत राहिला तो केवळ धर्मनिरपेक्षता, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय इत्यादी संवैधानिक मूल्यांमुळे. परंतु काही वर्षांपासून येनकेनप्रकारेण निवडणुका जिंकण्याच्या पक्षीय स्वार्थासाठी या मूल्यांवरच प्रहार करण्याचा आणि संविधान कुचकामी ठरवण्याचा उद्योग उजव्या शक्तींनी सुरू केला आहे. त्या पार्श्वभूमीवर आता संविधानाचे काय होणार, याची चिंता संविधानप्रेमी आणि देशप्रेमी लोकांना लागून राहिलेली असतानाच हिंदूबहुल तमिळनाडू राज्यातील मतदारांनी एका ख्रिश्चन व्यक्तीस आपला मुख्यमंत्री म्हणून निवडले ही घटना अत्यंत दिलासादायक आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर संवैधानिक मूल्यांवर एक दृष्टिक्षेप टाकू या. संविधानाने लोकांना आपापल्या धर्माचे, श्रद्धेचे स्वातंत्र्य जपण्याचा मूलभूत अधिकार बहाल केलेला असला तरी देशाचा, शासन व्यवस्थेचा मात्र स्वतःचा कोणताही धर्म संविधानास अभिप्रेत नाही. शासनासमोर सर्व धर्म-पंथांचे नागरिक समान आहेत. शासन आपले कर्तव्य निभावताना धार्मिक आधारावर (खरे तर कोणत्याही आधारावर) भेदभाव करणार नाही. हीच ती आपण स्वीकारलेली धर्मनिरपेक्षता. आपल्या देशात, लोकप्रतिनिधी कायदा १९५१ च्या कलम १२३ (३) अनुसार, कोणताही उमेदवार, त्याचे प्रतिनिधी किंवा समर्थक यांनी धर्म, जात, वंश, समुदाय किंवा भाषेच्या आधारावर मते मागितल्यास ते गंभीर स्वरूपाचे भ्रष्ट आचरण ( ) मानले जाते. असे करणाऱ्या विजयी उमेदवाराची निवड रद्द ठरू शकते. म्हणजे या कायद्यानुसार निवडणूक सुद्धा धर्मनिरपेक्ष अशीच झाली पाहिजे. परंतु गेल्या काही वर्षांपासून या धर्मनिरपेक्षतेला सुरुंग लावून धर्माधारित राष्ट्राची संकल्पना देशावर लादण्याचा प्रयत्न उजव्या शक्तींकडून वारंवार केला जात आहे. विविध माध्यमांवर नियंत्रण मिळवून, अल्पसंख्यांकांमुळे आपला (बहुसंख्यांक) धर्म धोक्यात आल्याचे नरेटीव्ह प्रसारित करताना अल्पसंख्यांकांविषयी विद्वेष व्यक्त करणारी असत्य, अर्धसत्य माहिती लोकांच्या गळी उतरवून स्थानिक निवडणुकांपासून संसदीय निवडणुकांपर्यंत खुलेआम धार्मिक आधारावर मते मागितली जात आहेत. लोकप्रतिनिधी कायद्याचा उघड भंग केला जात आहे. त्यावर विरोधकांनी केलेल्या तक्रारींची दखल संबंधित यंत्रणा घेत नाहीत. परिणामी, देशातील सामाजिक सद्भाव, बंधुता मोठ्या संकटात आहे. अल्पसंख्यांकांवर अन्याय करण्यास प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रोत्साहन देऊन संविधानातील न्याय या तत्त्वाची पायमल्ली केली जात आहे. बरे, धार्मिकतेच्या भ्रष्ट मार्गाने सत्ता हस्तगत करूनही यांचे समाधान होत नाही. शासनाने देशाचा कारभार हा धर्मनिरपेक्षतेनेच करायचा असतो असे संविधान सांगते. मंत्री, खासदार, आमदार आपल्या पदाची शपथ घेताना, कायद्यानुसार स्थापित झालेल्या भारताच्या संविधानावर खरी निष्ठा आणि श्रद्धा बाळगण्याची; भारताचे सार्वभौमत्व आणि अखंडता अबाधित ठेवण्याची आणि कर्तव्य निष्ठेने पार पाडण्याची शपथ घेतात. देशाचा कारभार करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध आहेत. तिथे कुठेही धर्माला स्थान नाही. परंतु गेल्या काही काळापासून हा देश धर्मनिरपेक्ष नसून हिंदूराष्ट्रच आहे, असा जाणीवपूर्वक गैरसमज करून घेऊन धर्माला राज्य कारभारात नको तेवढे स्थान देऊन धार्मिक उन्माद निर्माण केला जात आहे.

सध्याच्या राजकीय, धार्मिक वातावरणात आपले संविधान आणि विशेषतः धर्मनिरपेक्षता शेवटचे आचके देत आहे की काय असे वाटत असतानाच तमिळनाडूतील जनतेने विधानसभा निवडणुकीत धर्माधारित राजकारणाला छेद देऊन संविधानप्रेमी आणि देशप्रेमी लोकांना सुखद धक्का दिला आहे. या राज्यातील ८७ टक्के जनता हिंदू धर्मीय आहे. परंतु धार्मिक उन्मादाला, धार्मिक विद्वेषातून केलेल्या प्रचाराला बाजूस सारून त्यांनी आपल्या पसंतीच्या नेत्याला, म्हणजे ख्रिश्चन धर्मीय 'थलपती' विजय यांना आणि त्यांच्या पक्षाला त्यांचा धर्म न पाहता भरभरून मतदान केले. धर्मनिरपेक्षता काय असते याचे हे जीतेजागते उदाहरण आहे. मावळते मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांनीही नम्रपणे आपला पराभव स्वीकारून, 'थलपती' विजय यांचे अभिनंदन करून पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच मुख्यमंत्री बनण्याच्या विजय यांच्या मार्गात कोणी बाधा आणल्यास त्याला विरोध करणार असल्याचे घोषित केले. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यावर विजय यांनी स्टालिन आणि अन्य पक्षीय नेत्यांची त्यांच्या घरी किंवा कार्यालयात जाऊन सदिच्छा भेट घेतली. राजकीय परिपक्वता, संवैधानिक नैतिकता काय असते याचेही उदाहरण तमिळनाडू राज्यातील नेत्यांनी घालून दिले. ते आजच्या प्रदूषित वातावरणात खुलून दिसते.

खरे म्हणजे तमिळनाडूमधील नेत्यांनी राज्यात निवडणुकीनंतर जे केले तशाच प्रकारे संवैधानिक मूल्यांवर चालणारा भारत आपल्या संविधानास आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत होता. निवडणूक जिंकल्यावर संविधानास अपेक्षित असलेले कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठी निवडून आलेल्या सर्वच प्रतिनिधींनी एकदिलाने काम करणे अपेक्षित असते. काम करताना मतभेद होऊ शकतात, विधायक विरोध केला जाऊ शकतो. परंतु विकास, कल्याणकारी राज्य हे अंतिम उद्दिष्ट असल्याने त्यातून विचारांच्या देवाणघेवाणीतून मार्ग काढता येतो.

# वनविभागाचे दुर्लक्ष आणि जंगल तोडीचे वाढते प्रमाण;यामुळेच हिंसक पशुंकडून मानवीय हाणी होत आहे

राज्यासह देशात वाढते औद्योगिकीकरण, शहरीकरण,सीमेंट रोड,अनिर्बंध बांधकाम व काही ठिकाणी धार्मिकतेच्या नावावर मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे आणि ही बाब सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे तरीही काणावर हात आणि तोंडावर बोट ठेवून बघ्यांच्या भुमिकेत असतांना दिसते.याचाच परिणाम आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल,) यांची मानवावर व पाळीव प्राण्यांनवर आक्रमकता वाढल्याचे दिसून येते.सरकार दरवर्षी सांगत असते की, हजारो कोटींच्या झाडांचे वृक्षलागवड केली.परंतू प्रत्यक्षात वृक्षलागवड झालीच नसते फक्त ती कागदावरच झाल्याचे दिसून येते.आज सरकारने जंगल कटाई करून औद्योगिकरण, शहरीकरण व सिमेंट रोडचे मोठ्या प्रमाणात जाळे विणले व याचा दुष्परिणाम हळूहळू सर्वत्र जाणवत आहे.अशा परिस्थितीत सरकार झाडांची लागवड कुठे करीत आहे ही बाब समजण्यापलीकडची असल्याचे मला वाटते.सरकारकडून होणारी वृक्षलागवड १०० टक्या पैकी ८० टक्के लागवड फक्त कागदावरच असल्याचे वरील घटनांवरून दिसून येते.आज जंगल तोडीच्या कारणांमुळेच चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात वाघाच्या हल्यात चार महिलांचा बळी गेल्याचे दिसून येते.सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाहीच्या जंगलात दिनांक २२ मे २०२६ ला सकाळी तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला करून चौघींना जागीच ठार केले. अशीच घटना मागील वर्षी मे महिन्यातच तेंदूपत्ता संकलनासाठी गेलेल्या तीन महिलांना वाघाने हल्ला करून ठार मारले होते.अशा भयानक घटना सरकारच्या डोळ्यासमोर असुन सुद्धा जंगलतोड थांबलेली नाही व तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांना सरकारने कोणतेही संरक्षण दिलेले नाही हा अत्यंत चिंतेचा विषय आहे.आज जगातील सर्वात जास्त उष्ण शहरांच्या बाबतीत विचार केला तर भारतातील ५० शहरांमध्ये सुर्य आग ओकत आहे ही देशासाठी मोठी धोक्याची घंटा म्हणावी लागेल.कारण दिवसेंदिवस देशातील तापमान मोठ्या प्रमाणात वाढतच आहे.दिल्ली,यूपी, मध्यप्रदेश, महाराष्ट्रात पुढील ७ दिवस तापमानात वाढ होणार असल्याचे सांगितले जाते.त्यामुळे या राज्यातील अनेक शहरे ''रेड अलर्ट'' वर आहेत.आज महाराष्ट्रासह देशातील अनेक शहरांचे तापमानाने आपली संपूर्ण सिमा रेषा ओलांडली असून बहुतांश भागात ४५ अंश सेल्सिअस पार झाल्याचे दिसून येते.आज उष्णतेने संपूर्ण विदर्भ होरपळत आहे वर्धा-४७.१, ब्रम्हपुरी -४७.२, नागपूर -४६.६, अमरावती -४६.४, चंद्रपूर -४६.२ आणि इतर शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पार केल्याचे दिसून येते.यामुळेच हिंसक पशुंना पाण्यासाठी वणवण हिंडावे लागत.

कारण जंगलातील पाणथड्या सुध्दा आटल्या आहेत. बदलत्या हवामानामुळे, वाढत्या तापमानामुळे आणि जंगलतोडीमुळे जंगलातील पशुपक्षांसाठी असणारा पाणीसाठा संपुष्टात आल्याने वाघ-बिबट्या सारखे हिंसक पशुं गावाकडे किंवा गावांच्या आसपासच्या परिसरात किंवा शहराकडे धाव घेतांना दिसतात. त्यामुळे



आज चंद्रपूर जिल्ह्यातील गुंजेवाही परिसरात चार महिलांचा वाघाच्या हल्यात बळी गेल्याचे दिसून येते.मागील पाच वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यात २०२१-२५ दरम्यान २०० जणांचा वन्यजीव हल्यात मृत्यू झाला आणि चालू वर्षातील पाच महिन्यांतील आकडा १९ वर येवून पोहोचला आहे.अशा प्रकारे आतापर्यंत २१९ जणांचा बळी गेला. परंतु सरकारने यावर ठोस उपाययोजना अजुन पर्यंत केलेली ही शोकांतिका म्हणावी लागेल.अशा गंभीर घटनांवर सरकारने कायमस्वरूपी उपाय योजना अमलात आणावी लागेल तेव्हाच हिंसक पशुंवर नियंत्रण ठेवता येईल.

कारण वनविभाग आणि शासनाकडून प्रत्यक्ष उपाययोजनांचा अभाव असल्याने मोठ्या जीवीत हाणी होत आहे याचे जिवंत उदाहरण चंद्रपूरमध्ये दिसून आले हा अत्यंत चिंतेचा व गंभीर विषय आहे.आज जंगल तोडीमुळे हिंसक पशुं मानव व पाळीव प्राण्यांनवर हल्ले करीतच आहेत सोबतच जंगल तोडीचा परिणाम पाण्याची समस्या,अकाल इत्यादी अनेक गोष्टींशी निगडीत असल्याने पुढे चालून याचे गंभीर परिणाम पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवजंतूंना भोगावे लागतील.कारण वाढत्या तापमान व ढासळती वनसंपदा यामुळेच हिंसक पशुंनी मानववर आक्रमणाचा पवित्रा घेतल्याचे स्पष्ट दिसून येते.गेल्या अनेक वर्षांपासून चंद्रपूर जिल्ह्यात तेंदूपत्ता संकलन सुरू आहे.या संकलनातून दरवर्षी ३५ हजार कुटुंबांना रोजगार मिळतो. उन्हाळ्यात शेतीची कामे नसल्याने अनेक कुटुंबे जंगलात जाऊन तेंदूपत्ता संकलन करतात व आपला उदरनिर्वाह करतात.ही बाब वनविभाग व सरकारला चांगल्याप्रकारे ग्यात असतांना सुध्दा मजुरांना हिंसक पशुंपासुन सरकार संरक्षण करू शकत नाही ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. महाराष्ट्रात वन्यजीव प्राण्यांच्या हल्याने वाढती जीवीत हाणी अत्यंत चिंताजनक आहे यामध्ये २०२० मध्ये ९३ लोकांचा बळी गेला,२०२१ मध्ये ११८, २०२२ मध्ये १३४,२०२३ मध्ये-१४७,२०२४मध्ये-१६७ आणि २०२५ मे पर्यंत ७२ जणांचा मृत्यू हिंसक पशुमुळे झाला आहे.

ही संपूर्ण मानवीय हाणी जंगल कटाईमुळे निर्माण झालेली मोठी समस्या आहे यावर सरकारने ताबडतोब उपाययोजना करणे गरजेचे आहे.वन्य प्राण्यांना (विशेषतः बिबट्यां,वाघ) वन्यप्राण्यांपासुन मानवी हाणी रोखण्यासाठी महाराष्ट्राचे वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात शेळ्या सोडण्याचे म्हटले होते.तरीही वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणात मानवी हाणी होतांना आपण पहातो ही अत्यंत गंभीर बाब आहे. हिंसक प्राण्यांपासून होणारी मानवीय हाणी याचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने यावर तातडीने उपाययोजना करावीत.जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर**

# घनसावंगी येथे भव्य आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**घनसावंगी -प्रतिनिधी**

: उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त घनसावंगी येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, आरोग्यदूत फाउंडेशन, जुपिटर हॉस्पिटल ठाणे व रत्नानिधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले. या शिबिरामध्ये लहान मुलांसाठी मोफत २ इको तपासणी तसेच हृदय शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. दिव्यांग बांधवांसाठी मोफत मॉड्युलर हात व पाय वाटप शिबिर तसेच रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना आमदार हिकमत दादा उढाण म्हणाले की, ''आपण आतापर्यंत भरपूर शिबिरे आयोजित केली, पण हे शिबिर वेगळे आहे. लहान मुलांच्या हृदयात छिद्र असल्यास खाजगी रुग्णालयात लाखो रुपय खर्च येतो, पण आपण ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करून देणार आहोत. ज्यांना हात-पाय नाहीत त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येणार आहे.'' तसेच त्यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व नामदार एकनाथ शिंदे साहेब यांचे आभार मानले.

या कार्यक्रमात ऑनलाईन द्वारे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे साहेब यांनी उपस्थितांना संबोधित केले. आमदार हिकमत दादा उढाण यांचे कौतुक करताना ते म्हणाले की, ''लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा माझा लाडका आमदार हिकमत उढाण आहे. लोकांच्या आरोग्याची काळजी घेणारा आमदार हिकमत उढाण आहे. संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही द्वारे संवाद साधत सांगितले की, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्रभर आरोग्य शिबिरांचे आयोजन करत आहे. आमदार हिकमत दादा उढाण यांचे विशेष कौतुक करताना ते म्हणाले की, ''आमदार महोदय विकासाबरोबरच लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात नेहमी आघाडीवर असतात.'' आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांनीही द्वारे संवाद साधत सांगितले की, ''मला या कार्यक्रमाला यायचे होते. लवकरच उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पणाचा मोठा कार्यक्रम आमदार हिकमत दादा उढाण घेणार आहेत, त्यावेळी मी उपस्थित राहणार आहे.'' शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मा. मंगेश चिवटे यांनी रुग्णांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''आमदार हिकमत उढाण व सौ.मायाताई उढाण हे रुग्णांची अत्यंत आपुलकीने काळजी घेतात. तसेच आमदार हिकमत उढाण हे उपमुख्यमंत्री शिंदे साहेबांचे अत्यंत लाडके आमदार असून ते कधीही वैयक्तिक कामासाठी येत नाहीत, तर नेहमी जनतेच्या प्रश्नांसाठी तळमळ करत असतात.'' आरोग्यराज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी उपस्थितांना संवाद साधला व या अतिशय उदात्त भावनेतून आयोजित केलेल्या शिबिराला शुभेच्छा देत, या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी हिकमत दादांचे अभिनंदन केले. या शिबिरात १४७ लहान मुलांची मोफत २ इको तपासणी करण्यात आली तसेच १२५ दिव्यांग बांधवांची मोफत तपासणी करण्यात आली. ज्यांना पुढील शस्त्रक्रिया किंवा उपचारांची गरज आहे अशा रुग्णांना पुढील उपचारासाठी ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटल येथे नेण्यात येणार आहे तसचे रक्तदान शिबिरामध्ये २३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी डॉ. आशुतोष सिन्हा, डॉ. पूजा सिंग, डॉ. निशा, मा. डॉ. नादिया हजियानी, डॉ. प्रवरा कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, डॉ सौ मायाताई हिकमत उढाण, डॉ. राजन दादा उढाण, प्रसाद सूर्यराव, डॉ. बी.एफ. दोडके, डॉ. शार्दुल भनगे, डॉ. अविनाश गायकवाड, डॉ. दासरे, मा. मनोज चव्हाण, मा. डॉ. मरकडे, मा. राजेश माने, मा. डॉ. मुळे, मा. अदनान, मा. डॉ. दुधाळ,, डॉ. नवसागर, मा. डॉ. दराडे यांच्यासह तज्ञ डॉक्टर मंडळी उपस्थित होती. तसेच मोठ्या संख्येने पदाधिकारी, शिवसैनिक, रुग्ण व नागरिक उपस्थित होते.

## पान १ वरुन...

### भोकरदनमध्ये...

आली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून दुपारी सुमारे २.४५ वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकला.

छाप्यामध्ये गणपत रामधीन सेठी (वय ५४, रा. राजूर, ता. भोकरदन) आणि गीतांजली गणपत सेठी (वय ५१, रा. राजूर, ता. भोकरदन) हे दोघे आर्थिक फायद्यासाठी बाहेरील जिल्ह्यातील महिलांकडून कथित देहव्यापार करून घेत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान एका पीडित महिलेची सुटका करण्यात आली. तसेच घटनास्थळावरून रोख रक्कम आणि इतर साहित्य असा एकूण ३५,६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम, १९५६ अंतर्गत कलम ३, ४ आणि ५ नुसार गणपत सेठी, गीतांजली सेठी तसेच जागेचे मालक ज्ञानेश्वर विनायक वाघ (रा. भोकरदन) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी पती-पत्नीविरुद्ध यापूर्वीही हसनाबाद पोलीस ठाण्यात अशाच स्वरूपाचा गुन्हा दाखल असल्याची नोंद आहे. त्यामुळे या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून आरोपींच्या इतर संभाव्य गैरकृत्यांचाही शोध घेतला जात आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत, चालक ग्रेड पोलीस उपनिरीक्षक चव्हाण, पोलीस अंमलदार प्रशांत उबाळे, शिवाजी जाधव, किशोर मोरे, संदीप भुतेकर तसेच महिला पोलीस अंमलदार सीमा देठे आणि जयश्री कुहिरे यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

दरम्यान, या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब सहाने आणि पोलीस अंमलदार इंदल बमनावत करीत आहेत. शहरात सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यांविरोधात पोलिसांनी कठोर भूमिका घेतली असून अशा प्रकारच्या अवैध धंद्यांवर भविष्यातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे संकेत या कारवाईतून मिळत आहेत.

### शिंदे व

दिव्य दरबार भरवून लोकांचे आजार ओळखतो आणि आजार बरे करण्याचा दावा करतो. मात्र, अंधश्रद्धा निर्मलून समितीने दिलेले ३० लाख रुपयांच्या बक्षिसाचे आव्हान त्याने स्वीकारले नाही ,दोन वेळेस नागपूरमधून तो पळाला, असे ते म्हणाले.

२०१३ मध्ये राज्यात जादूटोणा विरोधी कायदा मंजूर झाला, पण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे अशोक खरात सारखे बाबा महाराष्ट्रात निर्माण होत आहेत. धीरेंद्र शास्त्री समाजामध्ये अनेक अवैज्ञानिक दावे करीत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यकाळात अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम वेगाने सुरू होते. मात्र, अलीकडे हे काम निधीअभावी मागे पडले. प्रबोधन कार्यक्रमांच्या माध्यमातून निधी संकलन करून आम्ही ते काम पुढे नेत आहोत, असेही मानव यांनी सांगितले. राज्यात जादूटोणाविरोधी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली तरच वाढत्या बुवाबाजीला आळा बसेल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना नारायण चाळगे यांनी बुवाबाजीला आळा घालण्यासाठी सरकारने कडक पाऊले उचलावीत, बाया ह्या बुवांकडे स्वतःहून जात नाहीत, तर त्यांना त्यांच्याकडे जाण्यास भाग पाडले जाते, बुवाबाजीच्या नादी लागलेल्या महिलेची सार्वजनिक बदनामी झाल्यानंतर तिचे कुटुंब उध्वस्त होते, हे टाळण्यासाठी बायांनी बुवांकडे जाणे टाळावे, बुवांबाजीला महिला बळी का पडतात, यावर मंथन करण्याची गरजही त्यांनी विषद केली. अध्यक्षीय समारोप करताना राजाभाऊ देशमुख म्हणाले की, अलिकडे राजकीय पक्षानी प्रवचनकारांना पक्षीय प्रचारक करून टाकले आहे, खरे सामाजिक प्रबोधनकार बोटावर मोजण्याएवढेच शिल्लक असून अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समाजात जागृती निर्माण करण्याची गरजही देशमुख यांनी प्रतिपादित केली.

प्रास्ताविक करतांना सुरेश झुरमूरे यांनी बुवाबाजी विरोधी अभियानांतर्गत अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्याची माहिती सांगितली. संचलन सुनील वाघ यांनी तर काकासाहेब खरात यांनी आभार मानले.

यावेळी अंकुशराव देशमुख, प्रा. बसवराज कोरे, डॉ. नारायण बोराडे,कॉ.अण्णा सावंत, डॉ.रावसाहेब ढवळे, प्रा. सुभाष देठे, गोविंदप्रसाद मुंदडा, सुदामराव सदाशिवे,डी.आर.खिल्लारे, विष्णू जायभाये, प्रकाश गडवे,प्रा.सत्संग मुंढे, अरूण वझरकर,सुभाष कोळकर,राजेंद्र गोरे,रमेश गव्हाड, गुलाब पाटील, मधुकर मोकळे, अनिल मिसाळ, संजय हेरकर, डॉ. प्रियदर्शन भवरे,वैशाली सरदार, मनिषा पाटील, निता कदम, शारदा नवल, संगिता गायकवाड, स्वाती मोरे, वर्षा काळे, वर्षा भिसे, छाया माने,प्रयाग नळगे यांच्यासह पुरुष व महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### प्रभाग ९ मधील...

आणि मिया-साहब दर्गा परिसर या सर्व भागांमध्ये मूलभूत सोयी-सुविधांचा मोठा अभाव निर्माण झाला आहे. सध्या कडक उन्हाळा सुरू असून नागरिकांना तब्बल १० ते १२ दिवसांनी पाणीपुरवठा केला जात आहे. तसेच कचरा व्यवस्थापन कोलमडल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रभागातील नागरिकांना होत असलेला त्रास लक्षात घेता महानगरपालिका प्रशासनाने या सर्व मागण्यांचे निराकरण अत्यंत तातडीने करावे गांभीर्याने न बघितल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शुभम टेकाळे यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रतिलिपि महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत, विरोधी पक्ष नेते कमलेश खरे आणि शिवसेनेचे स्वीकृत नगरसेवक अश्विन आंबेकर यांना देण्यात आल्या आहेत....

### शासकीय कर्तव्यावर...

दिशेने अत्यंत वेगाने येणाऱ्या एका कारने (क्रमांक एमएच ५५, बी ०१३९) त्यांच्या दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दोघीही महिला रस्त्यावर दूरवर फेकल्या गेल्या. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या दोन्ही महिलांना तातडीने उपचारासाठी जवळच्या खाजगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तनुजा घोडके- शिंदे यांना तपासणीअंती डॉक्टरांनी मृत घोषित केले.

त्यांच्या अकाली निधनाने तलवाडा गावात दु:खाचा डोंगर कोसळला असून, शुक्रवारी दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, एक लहान मुलगा, सासू-सासरे आणि आई-वडील असा मोठा परिवार आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या दुसऱ्या पर्यवेक्षिका अनुसया खलंग्रे यांच्यावर सध्या रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात अज्ञात कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलिसांनी दुर्घटनाग्रस्त कार जप्त केली आहे. अशा प्रकारच्या घटना अत्यंत दुर्दैवी आहेत. कर्तव्यावर असताना होणारे असे अपघात प्रशासकीय यंत्रणेसाठी मोठी हानी आहेत. महामार्गावर चालकांनी वाहनांचा वेग नियंत्रित ठेवणे आणि वाहतुकीचे नियम पाळणे ही काळाची गरज आहे.

# घनसावंगी येथे भव्य आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न

**घनसावंगी -प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ६२ व्या वाढदिवसानिमित्त घनसावंगी येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, आरोग्यदूत फाउंडेशन, जुपिटर हॉस्पिटल ठाणे व रत्नानिधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर पार पडले. या शिबिरामध्ये लहान मुलांसाठी मोफत २ इको तपासणी तसेच हृदय शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. दिव्यांग बांधवांसाठी मोफत मॉड्युलर हात व पाय वाटप शिबिर तसेच रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलताना आमदार हिकमत दादा उढाण म्हणाले की, ''आपण आतापर्यंत भरपूर शिबिरे आयोजित केली, पण हे शिबिर वेगळे आहे. लहान मुलांच्या हृदयात छिद्र असल्यास खाजगी रुग्णालयात लाखो रुपय खर्च येतो, पण आपण ही शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करून देणार आहोत. ज्यांना हात-पाय नाहीत त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येणार आहे.'' तसेच त्यांनी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष व नामदार एकनाथ शिंदे साहेब यांचे आभार मानले.

या कार्यक्रमात ऑनलाईन द्वारे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे साहेब यांनी उपस्थितांना संबोधित केले. आमदार हिकमत दादा उढाण यांचे कौतुक करताना ते म्हणाले की, ''लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा माझा लाडका आमदार हिकमत उढाण आहे. लोकांच्या आरोग्याची काळजी घेणारा आमदार हिकमत उढाण आहे.'

संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनीही द्वारे संवाद साधत सांगितले की, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष महाराष्ट्रभर आरोग्य शिबिरांचे आयोजन करत आहे. आमदार हिकमत दादा उढाण यांचे विशेष कौतुक करताना ते म्हणाले की, ''आमदार महोदय विकासाबरोबरच लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात नेहमी आघाडीवर असतात.'' आरोग्यमंत्री प्रकाश



आबीटकर यांनीही द्वारे संवाद साधत सांगितले की, ''मला या कार्यक्रमाला यायचे होते. लवकरच उपजिल्हा रुग्णालयाच्या लोकार्पणाचा मोठा कार्यक्रम आमदार हिकमत दादा उढाण घेणार आहेत, त्यावेळी मी उपस्थित राहणार आहे.'' शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मा. मंगेश चिवटे यांनी रुग्णांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ''आमदार हिकमत उढाण व सौ.मायाताई उढाण हे रुग्णांची अत्यंत आपुलकीने काळजी घेतात. तसेच आमदार हिकमत उढाण हे उपमुख्यमंत्री शिंदे साहेबांचे अत्यंत लाडके आमदार असून ते कधीही वैयक्तिक कामासाठी येत नाहीत, तर नेहमी जनतेच्या प्रश्नांसाठी तळमळ करत असतात.'' आरोग्यराज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी उपस्थितांना संवाद साधला व या अतिशय उदात्त भावनेतून आयोजित केलेल्या शिबिराला शुभेच्छा देत, या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी हिकमत दादांचे अभिनंदन केले.

या शिबिरात १४७ लहान मुलांची मोफत २ इको तपासणी करण्यात आली तसेच १२५ दिव्यांग बांधवांची मोफत तपासणी करण्यात आली. ज्यांना पुढील शस्त्रक्रिया किंवा उपचारांची गरज आहे अशा रुग्णांना पुढील उपचारासाठी ठाणे येथील ज्युपिटर हॉस्पिटल येथे नेण्यात येणार आहे तसचे रक्तदान शिबिरामध्ये २३ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या प्रसंगी डॉ. आशुतोष सिन्हा, डॉ. पूजा सिंग, डॉ. निशा, मा. डॉ. नादिया हजियानी, डॉ. प्रवरा कुलकर्णी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, डॉ सौ मायाताई हिकमत उढाण, डॉ. राजन दादा उढाण, प्रसाद सूर्यराव, डॉ. बी.एफ. दोडके, डॉ. शार्दुल भनगे, डॉ. अविनाश गायकवाड, डॉ. दासरे, मा. मनोज चव्हाण, मा. डॉ. मरकडे, मा. राजेश माने, मा. डॉ. मुळे, मा. अदनान, मा. डॉ. दुधाळ,, डॉ. नवसागर, मा. डॉ. दराडे यांच्यासह तज्ञ डॉक्टर मंडळी उपस्थित होती. तसेच मोठ्या संख्येने पदाधिकारी, शिवसैनिक, रुग्ण व नागरिक उपस्थित होते.

## मिठाई दुकानातील खाद्य पदार्थांमध्ये आळ्या : कारवाईची ग्रामस्थांची मागणी

**पिंपळगाव रेणुकाई - प्रतिनीधी**

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे एका नामांकित मिठाई दुकानातील खाद्य पदार्थांमध्ये वारंवार आळ्या आढळून येत असल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. एका ग्राहकाने घेतलेल्या बदाम शेकमध्ये आळ्या आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. यापूर्वीही पेढे तसेच इतर विविध मिठाई व खाद्य पदार्थांमध्ये आळ्या निघाल्याच्या घटना समोर आल्या असल्याचे नागरिकांनी सांगितले. या गंभीर प्रकारानंतर संबंधित दुकानदाराकडे नागरिकांनी जाब विचारला असता, दुकानदाराने उद्धट व मुजोरीची भाषा वापरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे,अनेक खाद्य पदार्थांवर एक्सपायरी डेट नसल्याचेही निदर्शनास आले आहे. तसेच दुकानातील स्वच्छतेबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप होत आहे. गावातील लहान बालकांसह सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून,अन्न व औषध प्रशासन विभाग मात्र या प्रकाराकडे सपशेल दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## ग्रामीण भागात अधिकमासची मोठी क्रेझ; धोंडा निमित्याने लेकबाळ जावाईचा आदर सन्मान


टेंभुर्णी (प्रतिनिधी) : अधिकमास म्हणजे धोंड्याचा महिना थोडक्यात लेक आणि जावाई यांच्या मान सन्मान आणि त्यांचा आदर सत्कार करून आपल्या इच्छे नुसार त्यांना वान आणि भेट वस्तू देऊन एक मस्त छोट्याखानी कार्यकम करण्याची पद्धत आहे.हिंदू धर्मात लग्न झालेल्या नवीन जोडप्यासाठी धोंडा म्हणजे एक पर्वणी म्हटल्यास वावगे ठरणार नाही. ग्रामीण भागात ही प्रथा मोठ्या आनंदात साजरी केल्या जाते येथील जेष्ठ व्यापारी श्री गणेशलाल बांगड यांनी आपल्या पांच ही मुली आणि जावई आणि त्यांच्या पूर्ण परिवार यांना सह स्नेह आमंत्रण देऊन त्यांचा आदर सत्कार करून हा सण मोठ्या आनंदाने साजरा केला. मराठी कॅलेंडरनुसार दर अडीच-तीन वर्षांनी येणाऱ्या जास्तीच्या (अधिक) महिन्याला धोंड्याचा महिना किंवा पुरुषोत्तम मास म्हणतात.या महिन्यात जावयाला घरी बोलावून त्याचा सन्मान करण्याची आणि त्याला ३३ गोड



धोंडे गव्हाच्या पिठाचे गोळे पुरण पोळी आंब्याचा रस सोबत इतर पक्वान्ने खाऊ घालण्याची प्रथा आहे.यालाच धोंड्याचे जेवण असे म्हणतात. शहरी भागात हा कार्यक्रम भक्कम प्रमाणात केल्या जातात मात्र यात ग्रामीण भाग ही मागे राहिला नाही असेच म्हणावे लागेल.

## मामाच्या गोव्याला जाऊया या चित्रपटात अंकुश चौधरीही होणार या गँगमध्ये सामील ३१ जुलैला चित्रपटगृहात पिकनिक

गोवा प्रत्येक फ्रेंड सर्कलच्या गप्पांमध्ये हमखास येणारा विषय. यार, एकदा तरी गोव्याला जायचंच! हा प्लॅन प्रत्येक ग्रुपमध्ये बनतो, काहींचा फसतो तर काहींचा आयुष्यभर लक्षात राहाणारा अनुभव ठरतो. अशाच मैत्री, धमाल, वेडेपणा आणि नॉस्टॅल्जियाने भरलेल्या एका भन्नाट ट्रिपची गोष्ट आता मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. विजू माने यांच्या आगामी मामाच्या गोव्याला जाऊया या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे. 'स्ट्रगलर साला' या गाजलेल्या सीरिजनंतर विजू माने पुन्हा एकदा मित्रांच्या जगात घेऊन जाणारा, हसवणारा आणि तितकाच रिलेट होणारा चित्रपट घेऊन येत आहेत. काही दिवसांपूर्वी या चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर या गोवा ट्रिपमध्ये नेमकं कोण सहभागी असणार, याची उत्सुकता होती. अखेर या भन्नाट गँगचा खुलासा झाला असून कुशल बद्रिके, अभिजीत चव्हाण आणि संतोष जुवेकर ही 'स्ट्रगलर साला'मधून लोकप्रिय झालेली तिकडी पुन्हा एकदा एकत्र झळकणार आहे. विशेष म्हणजे या धमाल गँगमध्ये आता अंकुश चौधरीचीही एन्ट्री झाली




असून त्यामुळे चित्रपटाची मजा आणखी रंगणार आहे. नुकतंच या चित्रपटाच्या पोस्टरचं अनावरण करण्यात आलं. मराठीत अशा प्रकारचा भवदिव्य सोहळा पहिल्यांदाच रंगला झाला असून या सोहळ्याला महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक अवधूत गुप्ते उपस्थित होते. पोस्टर प्रदर्शित झाल्यापासून सोशल मीडियावर या पोस्टरची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पोस्टरमध्ये दिसणारी ऊर्जा, मस्ती आणि मित्रांच्या चेहऱ्यावरची बेफिकीर धमाल अक्षरशः गोवा ट्रिपची फीलिंग देऊन जाते. एका बाजूला बाईकवर वेड्यासारखी एन्जॉय करणारी गँग, हवेत उडणाऱ्या बाटल्या, कॅन्स, रंगीबेरंगी कन्फेटी आणि पार्श्वभूमीतील बीच वाईब हे सगळं पाहाताना ही फक्त ट्रिप नाही, तर मैत्रीचा जल्लोष असणार आहे, हे स्पष्ट जाणवतं. पोस्टरमधील प्रत्येक कलाकाराचे एक्सप्रेशनच चित्रपटाच्या भन्नाट टोनची झलक देतो. विशेष म्हणजे पोस्टरमध्ये दिसणारी बेधुंद ऊर्जा ही फक्त कॉमेडीपुरती मर्यादित नसून, प्रत्येक मित्रांच्या ग्रुपने अनुभवलेल्या त्या 'गोवा प्लॅन'च्या आठवणींना छेडणारी आहे. त्यामुळे हा चित्रपट प्रत्येक वयोगटातील मित्रांना रिलेट होणार, अशी चर्चा आहे.

चित्रपटाबद्दल सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, ''या चित्रपटाची जितकी उत्सुकता प्रेक्षकांना आहे, तितकीच मलाही आहे. या संपूर्ण टीमने प्रेक्षकांना दिलेली सर्वात अमूल्य गोष्ट म्हणजे निरागस, मनमोकळं हास्य. मी स्वतः मैत्री जपणारा माणूस आहे. मैत्री ही कोणत्याही चौकटीत न बसणारी भावना आहे. तिची भाषा ही फक्त मैत्रीचीच असते. त्या नात्याला कोणताही रंग, बंधन किंवा अट लागू शकत नाही. गेली दहा वर्षे या कलाकारांनी आणि टीमने मैत्रीचा जो सुंदर धागा जपला आहे, तोच आता पुन्हा एकदा या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. कलाकारांविषयी बोलायचं झालं तर प्रत्येकाने आपल्या अभिनयातून प्रेक्षकांच्या मनात वेगळी जागा निर्माण केली आहे. त्यामुळे या चित्रपटाकडून अपेक्षा आणखी वाढल्या आहेत. संपूर्ण चित्रपटाच्या टीमला मनःपूर्वक शुभेच्छा. प्रेक्षकांनी या मैत्रीचा, हास्याचा आणि भावनांचा प्रवास नक्की अनुभवावा.'' चित्रपटाबद्दल दिग्दर्शक विजू माने म्हणतात, मैत्री, वेडेपणा, अचानक बनलेले प्लॅन्स आणि त्या ट्रिपमध्ये घडणारे भन्नाट अनुभव हे प्रत्येकाच्या आयुष्याचा भाग असतात. मामाच्या गोव्याला जाऊया हा फक्त गोव्याला जाण्याचा प्रवास नाही, तर मित्रांसोबत जगलेल्या क्षणांचा खजिना आहे. प्रेक्षकांना थिएटरमध्ये बसून स्वतःच्या मित्रांची आणि त्यांच्या ट्रिप्सची आठवण आल्याशिवाय राहाणार नाही.

फ्रेंडशिप, फन आणि फिल्म यांचा सुंदर मेळ यात अनुभवायला मिळणार आहे.'' फ्रेंडशिप डेच्या आठवड्यात म्हणजेच ३१ जुलै रोजी हा चित्रपट प्रदर्शित होत असल्याने मित्रांसाठी ही एक भन्नाट सिनेमॅटिक ट्रीट ठरणार आहे. मैत्री, धम्माल, नॉस्टॅल्जिया आणि गोव्याच्या मस्तीचा फुल्ल डोस देणारा मामाच्या गोव्याला जाऊया आता प्रेक्षकांना थिएटरमध्ये एक भन्नाट ट्रिप घडवण्यासाठी सज्ज झाला आहे. विजुमेनिया प्रा. लि. आणि लाईट अँड शेड प्रस्तुत या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन आणि निर्मिती विजू माने यांनी केली आहे. तर पटकथा आणि संवाद विजू माने, राहुल आवटे आणि कुशल बद्रिके यांचे आहेत.

**छायाकार : रमाकांत मुंडे मुंबई**

## जिल्ह्यातील तीन कारखान्याकडून होणारे उसाचे राजकारण थांबवा

### पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष विष्णूअन्ना माकोडे यांनी केली मागणी

**घनसावंगी - प्रतिनिधी**

समृद्धी साखर कारखाना तसेच महाकाळा येथील समर्थ साखर कारखाना आणि तीर्थपुरी येथील सागर कारखाना हे घनसावंगी तालुक्यात उसाचे राजकारण करीत आहेत. कार्यकर्ते वगळता इतर लोकांचे उस नेत नाहीत. समृद्धी साखर कारखाना खाजगी असून सुद्धा करोडो रुपयांचे शेअर्स बेकायदेशीर घेत असल्याची तक्रार पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना निवेदनातून मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष विष्णू अन्ना जनार्धन माकोडे यांनी केली आहे.

दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे की,जालना जिल्यातील समृद्धी साखर कारखाना व महाकाळा समर्थ साखर कारखाना, तीर्थपुरी सागर कारखाना हे घनसावंगी तालुक्यात उसाचे राजकारण करीत आहेत. आणि कार्यकर्ते सोडून इतर लोकांचे उस नेत नाहीत. तसेच समृद्धी साखर कारखाना खाजगी असून सुद्धा करोडो रुपयांचे शेअर्स बेकायदेशीर घेत आहेत. तसेच समृद्धीचे सतिश घाटगे शेतकऱ्यावर अन्याय करत आहेत.

दोघाचाही विधान सभा मध्ये पराभव झाल्या मुले शेतकऱ्यासोबत उसाचे राजकारण करून पैशाची वसुली करून परेशान करत आहेत. तसेच राजेश टोपे सागर, समर्थ या आपल्या दोन कारखाण्यामार्फत उसाचे राजकारण करत आहे. कारण माझा स्वतःचा उस पण यांनी नेला नसल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठीचा निधी औरंगजेबाच्या कबरीला दिल्या जाणाऱ्या निधीपेक्षा कमी

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकमेव मंदिराची उपेक्षा कधी थांबणार?

**रत्नागिरी - प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सिंधुदुर्ग किल्ल्यावरील 'श्री शिवराजेश्वर मंदिरा'साठी तब्बल ५५ वर्षांनंतर शासनाने वार्षिक निधी ३ हजार रुपयांवरून १ लाख रुपये केला खरा; मात्र हा वाढीव निधी क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीच्या खर्चापेक्षा कमी आणि अत्यंत तुटपुंजा आहे. औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी वर्षाला २ लाख ५५ हजार १६० रुपये (वर्ष २०२२-२३) आणि महाराष्ट्राच्या आराध्य दैवताला मात्र १ लाख, हे अत्यंत क्लेशदायक आणि दुर्दैवी आहे. हा छत्रपती शिवरायांचा अवमान आहे. उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे यांनी महसूल विभागाच्या प्रधान सचिवांना दर महिन्याला ५० हजार रुपयांचा निधी देण्याचे निर्देश दिले होते; मग हा निधी कमी कसा काय झाला ? प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या लेखी छत्रपती शिवरायांचे मूल्य औरंगजेबापेक्षा कमी आहे का, असा संतप्त सवाल हिंदु जनजागृती समितीचे जिल्हा समन्वयक श्री. गोविंद भारद्वाज यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

रत्नागिरी येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला श्री. संजय जोशी (राज्य समन्वयक, महाराष्ट्र मंदिर महासंघ), श्री. मयूर भितळे, (रत्नागिरी विभाग प्रमुख, गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), श्री. अरविंद बारस्कर (शिवचरित्र कथाकार), श्री. दीपेश वारंगे (जिल्हाध्यक्ष, गड किल्ले संवर्धन प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य), अधिवक्ता अमित काटे आणि श्री. सोहम खानविलकर (श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, रत्नागिरी)आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून हिंदु जनजागृती समिती, हिंदु विधीज्ञ परिषद आणि शिवप्रेमी हा निधी वाढवण्यासाठी संघर्ष करत आहेत. महायुती सरकारने नुकताच २० मे २०२६ रोजी शासन निर्णय काढून श्री शिवराजेश्वर मंदिराचे वार्षिक अनुदान १ लाख रुपये केले. वरवर पाहता ही वाढ चांगली वाटत असली, तरी वास्तवात हा निधी आताही अत्यंत अपुरा आहे. माहितीच्या अधिकारातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून औरंगजेबाच्या कबरीच्या देखभाल दुरुस्तीसाठी वर्ष २०२२ आणि २०२३ मध्ये तब्बल २,५५,१६० व २,००,६२६ रुपये निधी दिला गेला आहे.

म्हणजेच, हा निधी छत्रपतींच्या मंदिराला घोषित निधीपेक्षा दुप्पट आहे. वार्षिक १ लाख रुपये का अपुरे आहेत? : शासनाने मंजूर केलेल्या वार्षिक १ लाख रुपये निधीचा हिशोब केल्यास, महिन्याला जेमतेम ८,३३३ रुपये, अर्थात २७४ रुपये प्रतीदिनी वाट्याला येतात. एका दिवसाच्या खर्चाचा विचार केला, तरी महाराजांच्या मूर्तीवरील नित्यपूजेसाठी फुले, मोठा हार, रोजची दिवाबत्ती, धूप, नारळ, पूजाआरती, भाविकांना प्रसाद, मूर्तीला वस्त्रांलंकार, मंदिराची स्वच्छता, परिसर स्वच्छता, रोज मंदिरात बोटीने ये-जा करण्यासाठीचा प्रवास खर्च; मासिक खर्चामध्ये पुजाऱ्याचे वेतन, स्वच्छता कर्मचाऱ्यांचे वेतन; नैमित्तिक खर्चामध्ये मंदिराची रंगरंगोटी-डागडुजी आणि शिवजयंतीसारखे वार्षिक व अन्य उत्सव यांचा विचार करता वर्षाला १ लाख खर्च अत्यंत तुटपुंजा आहे.

काहीच केले नाही. आताचे हिंदुत्ववादी सरकार, छत्रपती शिवरायांच्या विचारांचे सरकार आहे, त्यामुळे या निधीमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला, हा स्तुत्य निर्णय आहे; मात्र हा वाढीव निधीही तुटपुंजा आहे, हे आम्हाला सरकारच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. महाराजांच्या मंदिराकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे. तसेच महाराष्ट्रावर चालून आलेला आक्रमक क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी दिला जाणारा निधी तात्काळ बंद करून तो निधीही शिवकार्यासाठी वळवावा, अशीही आम्ही मागणी करत आहोत. छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्राचीन व ऐतिहासिक मंदिरासाठी विशेष बाब म्हणून जोपर्यंत महिन्याला किमान १ लाख रुपयांचा (वार्षिक १२ लाख) निधी मंजूर केला जात नाही, तसेच मंदिर परिसराचे सुशोभिकरण केले जात नाही, तोपर्यंत आमचा हा लढा आणि पाठपुरावा असाच चालू राहील. सरकारने तातडीने यावर योग्य तो निर्णय घेऊन महाराष्ट्राच्या अस्मितेला न्याय द्यावा, असेही समितीने म्हटले आहे.

# रात्री उशिरापर्यंत पेट्रोल पंपावर थांबलेल्या लोकांना जेवण

## टेंभुर्णी पंप चालक संजय सावंत यांचा वेगळा आदर्श

**टेंभुर्णी- दत्ता देशमुख**



सध्या महाराष्ट्र मध्ये डिझेल आणि पेट्रोल ची खूप अडचण आणि टंचाई सुरू आहे. जो तो व्यक्ती नागरिक या साठी परेशान आहे. आपल्याला डिझेल पेट्रोल भेटावे म्हणून तो आपले वाहन कॅन घेऊन सगळ्या बाबी सोडून नुसत्या पंपावर उभा आहे.

ही अडचण इतकी वाढली की त्यांना अक्षरशा दहा दहा बारा बारा तास पेट्रोल पंपावर थांबावे लागत आहे या त्यांच्या जेवणाची मोठी अडचण झाली होती हीच अडचण लक्षात घेता टेंभुर्णी येथील कल्पतरू पेट्रोलियम तर्फे डिझेल साठी मुक्कामी थांबलेल्या शेतकऱ्यांसाठी जेवण्याची चांगली व्यवस्था करून त्यांचा गरम गरम जेवण आणि थंडगार पाणी देऊन त्यांचे समाधान केले. म्हणतात ना ग्राहक हे देवाचे रूप असतात त्यांची जाणीव ठेवून त्याने जेवण देऊन एक समाधानाचे काम झाल्याची भावना या वेळी पंप मालक संजय सावंत यांनी बोलवून दाखविली. त्यांच्या या एका वेगळ्या आदर्शाची संपूर्ण तालुक्यामध्ये प्रशंसा होत असून, सामाजिक बांधिलकी काय आहे हा आदर्श दाखवून दिला आहे. विविध प्रकारच्या अडचणीमुळे नागरिकांना शेतकऱ्यांना पेट्रोल पंपावर रांगा लावून थांबावे लागत असल्याने, त्यांच्या जेवणाचा प्रश्न निर्माण झाला होता. टेंभुर्णी तील संजय सावंत पेट्रोल पंप चालक यांची नेहमी सामाजिक बांधिलकी असते. विविध सामाजिक कामामध्ये, त्यांचा हिरवीने सहभाग असतो या सहभागाच्या भावनेतूनच त्यांनी एक वेगळा आदर्श निर्माण केलेला आहे आणि या आदर्श निर्माण केल्यामुळे त्यांच्याबद्दल कौतुक होत आहे.

# आठपैकी एका महिलेला थायरॉईडचा विळखा; योग्य पोषणाने आजाराला ठेवा दूर-डॉ. सेठिया

## वजन वाढणे-घटणे इतकेच नाही, तर केस गळणे, कोरडी त्वचाही थायरॉईडची लक्षणे

**जालना -प्रतिनिधी**

थायरॉईड म्हणजे केवळ वजनाचा आजार नव्हे. वजन वाढणे-घटणे इतकेच नाही, तर केस गळणे, कोरडी त्वचा ही थायरॉईडची लक्षणे आहेत. ६० टक्क्यांपेक्षा जास्त लोक शरीरात थायरॉईडची समस्या असूनही ती वेळेवर ओळखू शकत नाहीत. ८ पैकी १ महिलेला थायरॉईडचा विळखा असून, योग्य पोषणाने आजाराला ठेवा दूर ठेवता येऊ शकते, अशी माहिती रुबी हॉस्पिटलचे संचालक तथा ''अब की बार थायरॉईड टेस्ट दस हजार पार या रोटरी रेनबोच्या वर्षभरात दहा हजार मोफत थायरॉईड चाचण्या या अभियानाचे प्रकल्प प्रमुख डॉ. राजेश सेठिया यांनी दिली.

दरवर्षी २५ मे रोजी जगभरात जागतिक थायरॉईड दिन साजरा केला जातो. या वर्षी थायरॉईड आरोग्याविषयी व्यापक जागरूकता निर्माण करण्यासाठी






थायरॉईड आणि पोषण यांचा संबंध या मुख्य विषयावर विशेष लक्ष केंद्रित केले गेले आहे. या दिनाचे औचित्य साधून याबाबत डॉ. राजेश सेठिया यांनी सांगितले की, थायरॉईड हा केवळ वजन वाढण्याचा किंवा घटण्याचा आजार नाही. ही गळ्यातील एक अत्यंत महत्त्वाची ग्रंथी असून ती तयार करत असलेली संप्रेरके (हॉर्मोन्स) हृदयाचे ठोके, शरीराचे तापमान, ऊर्जा पातळी, मानसिक मूड, पचनक्रिया आणि महिलांच्या मासिक पाळीवर थेट परिणाम करतात. अमेरिकन थायरॉईड असोसिएशनच्या मते, महिलांमध्ये ही समस्या सर्वाधिक आढळते; दर ८ पैकी १ महिलेला आयुष्यात हा आजार होण्याची शक्यता असते. हायपो व हायपर- थायरॉडिझम हे थायरॉईडचे २ प्रकार असून हायपोथायरॉडिझममध्ये थायरॉईड ग्रंथी गरजेपेक्षा कमी प्रमाणात संप्रेरके तयार करते. यामुळे शरीराची चयापचय प्रक्रिया कमालीची संथ होते. परिणामी, रुग्णाला प्रचंड थकवा जाणवणे, अचानक वजन वाढणे,

बद्धकोष्टता , जास्त थंडी वाजणे अशी लक्षणे दिसतात. हायपरथायरॉडिझममध्ये संप्रेरके जास्त प्रमाणात तयार होतात, ज्यामुळे चयापचय प्रक्रिया कमालीची वेगवान होते. याची मुख्य लक्षणे म्हणजे भूक वाढूनही वजन झपाट्याने कमी होणे, हृदयाचे ठोके वाढणे, जास्त घाम येणे आणि उष्णता सहन न होणे ही आहेत. या वर्षीच्या मुख्य संकल्पनेनुसार, थायरॉईड नियंत्रणात योग्य पोषणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शरीरात आयोडिनचे असंतुलन हे थायरॉईड बिघाडाचे मुख्य कारण ठरते. आहारात योग्य प्रमाणात आयोडिनयुक्त मीठ घ्यावे, जास्त प्रमाणही अपायकारक ठरते.

# जायभाये कोचिंग क्लासेसतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न

**मंठा- प्रतिनिधी**

मंठा शहरात आज दि. २४ मे रोजी रविवारी इयत्ता १० वी सन २०२६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी व त्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी जायभाये कोचिंग क्लासेस, मंठा यांच्या वतीने भव्य ''गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा'' आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. आर. के. राठोड सर हे होते. तर मार्गदर्शक म्हणून डॉ. स्वराज बोराडे सर यांनी विद्यार्थ्यांना





भविष्यातील शिक्षण, स्पर्धा परीक्षा व करिअर संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून युवा पत्रकार संदीप गायकवाड यांची उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सातत्य, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश संपादन करता येते, असे प्रेरणादायी विचार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी जायभाये कोचिंग क्लासेसचे संचालक सचिन जायभाये सर, गणेश खिस्ते सर, स्वाती जायभाये मॅडम, राठोड सर, बळी सर तसेच संपूर्ण शिक्षक वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# एका घरातील तीन पिढ्या डॉक्टर डॉ.विपुल काबरा यांचा सत्कार

**टेंभुर्णी -दत्ता देशमुख**



येथील जेष्ठ नागरिक तसेच डॉक्टर गंगाबीसन काबरा हे कित्येक वर्षा पासून आपला डॉक्टरकीचा व्यवसाय करत आहे. त्यांच्या मुलगा ही त्यांच्या पाऊल वर पाऊल टाकत डॉक्टर प्रशांत काबरा हे डॉक्टर आणि त्यातून समाज सेवा करत आहे. त्यांच्या दोघांचा आदर्श घेत आपल्या दादा आणि आपल्या वडिलांच्या आदर्श घेऊन विपुल ने आपले शिक्षण पूर्ण करत नुकताच डॉक्टर बनून एक वेगळा आदर्श निर्माण केला. तो डॉक्टर झाल्या बद्दल त्यांचे येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने त्यांच्या घरी जाऊन एका घरातील तीन पिढ्या डॉक्टर झाल्या बद्दल सत्कार केला. या वेळी समाजाच्या वतीने सुभाष काबरा प्रदीप काबरा मनीष सोमाणी गोपाल बांगड धीरज काबरा पंकज काबरा गणेश काबरा कल्पेश सोमानी यांच्या सह समाज बांधव उपस्थित होते.

या वेळी डॉक्टर गंगाबीसन काबरा प्रशांत काबरा सौ. कविता काबरा यांच्या सह विपुलची आजी सर्व परिवार उपस्थित होते.

# मागासवर्गीय शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर कास्ट्राईब शिष्टमंडळाची शिक्षण उपसंचालकांशी चर्चा

**जालना - प्रतिनिधी**

दिनांक २३ मे २०२६ रोजी शिक्षण उपसंचालक कार्यालय, संभाजीनगर येथे कास्ट्राईबच्या शिष्टमंडळाने विभागीय शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ यांची भेट घेऊन मागासवर्गीय शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसंदर्भात निवेदन सादर केले व सविस्तर चर्चा केली.

यावेळी दातखीळ यांनी शिष्टमंडळाने मांडलेल्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. निवेदनामध्ये खाजगी संस्थांमधील अनुशेषाची तात्काळ माहिती उपलब्ध करून देणे, भविष्य निर्वाह निधी व वैद्यकीय देयकांची प्रकरणे त्वरित निकाली काढणे, पदोन्नती प्रक्रियेत मागासवर्गीय शिक्षकांवर होणारा अन्याय थांबविणे, तसेच शिक्षक समायोजन करताना अन्याय होणार नाही याची खबरदारी घेण्याची मागणी करण्यात आली.

तसेच बदली धोरणामध्ये मागासवर्गीय शिक्षकांचे हित अबाधित ठेवावे, खाजगी संस्थाचालकांकडून विनाकारण चौकशी लावून होणारा त्रास थांबवावा आणि संबंधित शिक्षक-कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

या शिष्टमंडळामध्ये राज्य सरचिटणीस सतीश कांबळे, वरिष्ठ उपाध्यक्ष (जनरल) सुमित भुईगळ, विभागीय अध्यक्ष राजेश सदावर्ते, जिल्हाध्यक्ष सुभाष मस्के, जिल्हा सचिव शिवानंद खरात, जिल्हा नेते राजेश मुंगीपैठणकर आदी उपस्थित होते.

## सरकार जगाच्या पोशिंदाच्या भावनेशी खेळतय

# शेतकरी डिझेलसाठी रांगेत, सरकारचे दावे हवेत; महिला जिल्हाप्रमुख रूपम घुगे

## शेतकऱ्यांची डिझेल-पेट्रोलसाठी होणारी परवड थांबवा अन्यथा शिवसेना

**जालना - प्रतिनिधी**

निसर्गा पाठोपाठ आता सरकारनेही शेतकऱ्यांना वेठीस धरण्याचे काम सुरु केले आहे. ऐन खरीप हंगाम तोंडावर असताना शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळत नसल्याची अत्यंत भयावह परिस्थिती आहे. मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्यांना शेती मशागतीसाठी ट्रॅक्टरसाठी लागणारे डिझेल-पेट्रोल उपलब्ध करून द्या अन्यथा शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाला शेतकऱ्यांच्या हितासाठी मोठे आंदोलन करावे लागेल असा इशारा महिला जिल्हाप्रमुख रूपम रमेश घुगे यांनी दिला आहे. राज्यात अनेक ठिकाणी डिझेल पेट्रोल टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना पेट्रोल पंपांवर तासन्तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र आहे. यावर प्रतिक्रिया देताना रूपम घुगे म्हणाल्या की, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात इंधनाचा पुरेसा साठा असल्याचे वक्तव्य केले होते. मग प्रत्यक्षात शेतकऱ्यांना लाईनमध्ये का



उभे राहावे लागत आहे? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. पहिला पाऊस सुरू होण्याच्या तोंडावर शेतकरी शेत मशागतीच्या तयारीत आहेत. ट्रॅक्टर, पंप आणि शेतीची इतर यंत्रणा चालवण्यासाठी डिझेल अत्यावश्यक असताना शेतकऱ्यांना वेळेवर इंधन मिळत नसल्याने मोठा संताप व्यक्त होत आहे. आज आपण दोन वेळच्या जेवणासाठी शेतकऱ्यावर अवलंबून आहोत. मात्र त्याच शेतकऱ्याला डिझेलसाठी भटकावे लागत असेल तर ही शासनासाठी लाजिरवाणी बाब आहे, असेही घुगे म्हणाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थिती नियंत्रणात येण्यासाठी ३० जूनपर्यंतची मुदत दिली होती. यावरही रूपम घुगे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत, जर परिस्थिती इतकी गंभीर होती तर उपाययोजना आधी का करण्यात आल्या नाहीत ? ३० जूनची वाट का पाहिली जात आहे? असा सवाल केला. जालना जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी कॅनमध्ये डिझेल देण्यास बंदी घालण्याच्या निर्णयावरही त्यांनी टीका केली. शेतकरी अनेकदा शेतात असतो. प्रत्येक वेळी ट्रॅक्टर घेऊन पंपावर जाणे शक्य नसते. मग कॅनमध्ये डिझेल मिळाले नाही तर शेतकऱ्यांनी शेतीची कामे कशी करायची? असा प्रश्न त्यांनी प्रशासनासमोर उपस्थित केला. शासनाने तातडीने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल पुरवठा व्यवस्था करावी, ग्रामीण भागातील पंपांवर विशेष सुविधा द्याव्यात आणि खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही रूपम घुगे यांनी केली आहे.

# विवेकानंद सेवा केंद्राचे शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश




**परतूर -प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे , यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विवेकानंद सेवा केंद्र परतुर संचलित विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर, विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर, विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळा विवेकानंद इंग्लिश स्कूल केंधळी मंठा, अशा ४ शाळेचे एकूण ४२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये,विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे.

या परीक्षेमध्ये एकूण ४२ विद्यार्थी पात्र ठरले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव व शिक्षकांचे परिश्रम यामुळे हे यश मिळाले असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर एस.जी.बाहेकर साहेब, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक, संदीप दादा बाहेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका, श्रीमती. शिंदे मॅडम, प्रिन्सिपल महाजन सर, दंदाले सर ,विष्णू बाहेकर सर्व शिक्षक वृंद,सर्व पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकवृंद, पालक व संस्थेचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून विवेकानंद सेवा केंद्राचे कौतुक करण्यात येत आहे.

# टेंभुर्णी ग्रामपंचायत ने सोडले नळाला पाणी- सोमनाथ तांबेकर

**टेंभुर्णी -दत्ता देशमुख**



टेंभुर्णी - तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथील, टेंभुर्णीच्या नळाला १८ दिवसानंतर पाणी दैनिक युवा आदर्शमध्ये प्रसिद्ध होताच ग्रामपंचायतची यंत्रणा कामाला लागली. ग्राम विस्तार अधिकाऱ्यापासून ते कर्मचाऱ्यांपर्यंत धावपळ सुरू झाली. ज्या भागामध्ये पाणी कमी आले होते त्या भागाची पाहणी तात्काळ करण्यात आली. महिलांच्या मोर्चाचा एवढा परिणाम झाला, उद्या अनेक भागांमध्ये पाणी न आल्यास उद्रेक होऊ शकतो याची जाणीव ग्रामपंचायतला झाली. वृत्तपत्रात बातम्या झळकू लागल्याने विकासाच्या नावाखाली असलेल्या पाणी योजना फेल ठरते की काय अशी आता भावना गावकऱ्यांमध्ये निर्माण होऊ शकते व त्याचा उद्रेक होऊ शकतो. भावना लक्षात घेऊन ग्रामपंचायतने तात्काळ युद्ध पातळीवर यंत्रणा राबवून भागात कमी पाणी आले होते त्या भागाला आज सकाळीच पाणी सोडले. व ज्या मोर्चेकर महिलांनी मोर्चा केला होता मोर्चाची दखल घेऊन वृत्तपत्रांनी बातम्या प्रसिद्ध केल्या त्या वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना फोन करून सांगितले की आमच्याकडे पाणी आलेले आहे. मोर्चेकर महिलांनी व त्यांच्यासोबतचे कार्यकर्ते यांनी ग्रामपंचायती व वृत्तपत्र यांचे आभार मानले.

चौकट :-

एक वृद्ध नागरिक आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना सांगितले गाव असे नव्हते, गावातील यंत्रणा ग्रामपंचायत सर्व लोक, तसेच लोकांचे कामे तात्काळ केल्या जात होती. परंतु आमच्या गावाला कुणीकडून ग्रहण लागले आणि एवढ्या मोठ्या गावाला योजनेसाठी झगडावे लागते ही एक शोकांतिका आहे असे त्या वृद्ध व्यक्तीने सांगितले. जागरूक लोकांनी यासाठी जागरूक राहिलं पाहिजे हीच भावना त्या वृद्ध प्रतिनिधींनी आमच्या प्रतिनिधींना जवळ व्यक्त केले. पूर्वी लोकसहभागातून ग्रामपंचायतचा कारभार चालवला जात असे. परंतु आता ग्रामपंचायतला विविध प्रकारचा निधी येतो. त्या निधी मधून विविध योजना राबवल्या जात असतात. हे राबवणारी यंत्रणा मात्र कुठेतरी कमी पडत आहे असं यावरून दिसत आहे. वृद्ध व्यक्ती पुढे असेही म्हणाले की जेव्हा नळाला पाणी येते गावामध्ये टाकलेल्या ड्रेनेज पाईपलाईन मधून पाणी जातच नाही ते सर्व पूर्ण रस्त्यावर थांबलेले असते आणि त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती निर्माण होते. लोकप्रतिनिधींकडून विविध विकास कामांची घोषणा केल्या जाते विविध विकास कामे करून घेतल्या जातात. परंतु त्या विविध विकास कामांचा उपयोग जनतेसाठी असतो हे गावातील कार्यकर्ते विसरलेले आहेत. आता ग्रामपंचायत सदस्यांचा कार्यकाळ संपलेला असल्याने गावातील ही संपूर्ण कार्यकर्ते मंडळी आता आपापल्या कामांमध्ये व्यस्त आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.